सा. बां. वि. अहमदनगर

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील तरतुदीतून मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे (लेखाशिर्ष २५१५ १२३८) या योजनेअंतर्गत विकासकामांना मंजुरी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व पंचायत राज विभाग**
**शासन निर्णय क्र. विकास-२०२४/प्र.क्र२४९/योजना-६**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक : ०३ ऑक्टोबर, २०२४

संदर्भ: १) शासन निर्णय, ग्रा.वि.व.ज.सं.वि.क्र. झेडपीए-२०१५/प्र.क्र-१०/वित्त-९, दि/ २५/०३/२०१५.
२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय .क्र. विकास-२०१९/प्र.क्र-४४/योजना-६, दि/ २५/०७/२०१९.
३) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय .क्रमांक: विकास-२०२०/प्र.क्र-२२५/योजना-६, दि/ १७/०२/२०२०.
४) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक: विकास-२०२२/प्र.क्र-१०१/यो-६, दि/ ३१/०३/२०२२.
५) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६,दि.०१/०२/२०१९.
६) ग्रामविकास विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र. विकास-२०१८/प्र.क्र.२२५/योजना-६,दि.०८/०३/२०१९.
७) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. विकास-२०१९/प्र.क्र.४४/योजना-६,दि.२५/०७/२०१९.
८) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: विकास-२०२०/प्र.क्र.२२५/योजना-६,दि.१७/०२/२०२०.
९) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: विकास-२०२२/प्र.क्र.१०१/यो-६,दि.३१/०३/२०२२.

**शासन निर्णय :-**

राज्यातील गावांतर्गत मूलभूत सुविधांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देणे बाबत अनेक लोकप्रतिनिधींकडून प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होत असतात त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधांच्या कामासंदर्भात संदर्भाधिन क्र. २ ते ८ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत.

२. सबब सदर शासन निर्णय सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील तरतुदीतून सोबत जोडलेल्या अनुसूची प्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील विकासकामांसाठी एकूण रुपये ५ कोटी ५५ लक्ष इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेअंतर्गत राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांना निधी वितरणासाठी LPRS (Liability Payment Register System) प्रणाली राबविण्याबाबत दिनांक ३१ मार्च २०२२ च्या शासन परिपत्रकांवर निर्णय घेण्यात आला आहे सदर निर्णयाच्या अनुषंगाने सदर मंजूर कामांचा निधी LPRS (Liability Payment Register System) प्रणाली द्वारे वितरित करण्यात येईल.

४. या शासन निर्णय मंजूर केलेल्या कामांसाठी प्रचलित कार्यपद्धतीनुसार तांत्रिक मंजुरी निविदा काढणे स्वीकारणे व कार्यारंभ आदेश देणे इत्यादी बाबतचे कार्यवाही क्षम प्राधिकाऱ्याकडून करून घेण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ अहमदनगर यांची राहील मंजूर कामांची विहीत अंदाजपत्रके तयार करून अशा कामांना उचित प्रदेश प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करणे आवश्यक राहील तसेच सदरील काम मंजूर अनुदानाच्या मर्यादितच पूर्ण होतील याची दक्षता घेण्यात

यावी मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्चाच्या कामांना मान्यता दिल्यास त्यासाठी कुठले स्वरूपात अतिरिक्त अनुदान उपलब्ध करून दिले जाणार नाही.

५. सदरील कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित क्षेत्रात जिल्हा परिषद पंचायत समिती व ग्राम पंचायतीच्या सार्वजनिक निवडणुका पोटनिवडणुकांसाठी आचारसंहिता अमलात नाही याबाबत संबंधित अधिक्षक अंबियांचा सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी खात्री करावी.

६. सर्व कामांच्या पूर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी महालेखापाल संबंधित विभागीय आयुक्त व शासनास पाठवावेत तसेच कामे दर्जेदार व चांगल्या प्रतीचे असल्याबाबत विहित समिती संबंधितांकडून खात्री करून घेण्यात यावे कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी याबाबत संबंधित अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी विशेष दक्षता घ्यावी अन्यथा कसूरदारांवर शासन स्तरावर कारवाई करण्यात येईल

७. सदर शासन निर्णय सोबतच्या यादीतील मंजूर झालेली कामे मागील पाच वर्षात २५१५ १२३८ लेखाशीर्षाखाली किंवा अन्य योजनेतून करून घेण्यात आली नाहीत याची संबंधित यंत्रणेने खात्री करावी जर कोणत्याही योजनेतून पाच वर्षांपूर्वी अशी कामे करून घेतली असल्यास अशा प्रसंगी ते काम सुस्थितीत आहे किंवा कसे याबाबत संबंधित यंत्रणेने खात्री करूनच ती हाती घेण्यात यावी तसेच अशी कामे अन्न योजनेतून मंजूर असून ती सुस्थितीत आढळल्यास अशा कामांच्या बाबतीत तपशिलासह शासनास अवगत करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी शासन निर्णय वित्त विभाग महाराष्ट्र शासन मधील अटी व शर्तीचे पालन करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(अभिजित तेलवेकर)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, ग्रा.वि यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर.
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर.
७) निवडनस्ती, कार्यासन योजना-६.

| ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. विकास-२०२४/प्र.क्र.२४९/ योजना-६ दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ च्या आदेशासोबतची अनुसूची - २५१५ १२३८ अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील (सा.बां.वि.) विकास कामाची यादी | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **रक्कम रु. लक्ष** |
| १ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील यशवंतराव होळकर चौक ते आरंभ अपार्टमेंट कॉर्नर रस्ता करणे | २५.०० |
| २ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील एचडी स्पोर्ट्स क्लब ते सिद्धिविनायक नगर रस्ता करणे | २५.०० |
| ३ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील सिद्धिविनायक नगर ते जय नगर रस्ता करणे | २५.०० |
| ४ | मौजे बुऱ्हानगर ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथील आरंभ अपार्टमेंट कॉर्नर ते एस डी स्पोर्ट्स क्लब रस्ता करणे | २५.०० |
| ५ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर तुकाराम वाघमोडे ते हिवरे झरे रोड रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ६ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर महादेव मंदिर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ३०.०० |
| ७ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर लक्ष्मण इंगळे यांच्या घर ते रेवण इंगळे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ८ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर भिवणेश इंगळे यांचे घर ते गुंडेगाव रोड रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ९ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर चौधरी यांचे घर ते वडगाव रोड रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| १० | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर अनिल वाघमोडे यांचे घर ते तुकाराम वाघमोडे यांचे घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| ११ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर वडगाव रोड ते विजय देवीकर यांचे घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ३०.०० |
| १२ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर अंबिका मंदिर ते रामदास गवळी घर रस्ता करणे | २५.०० |
| १३ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर स्वस्त धान्य दुकान ते कोरडे मळा रस्ता करणे | २५.०० |
| १४ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर मारुती मंदिर ते अतुल बरवाडे घर रस्ता करणे | २५.०० |
| १५ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर वाकोडी मार्केट यार्ड रोड ते इनामदार मळा रस्ता करणे | २५.०० |
| १६ | मौजे वाकोडी ता. अहमदनगर जि. अहमदनगर वाळुंज रोड ते जिल्हा परिषद शाळा रस्ता करणे | २५.०० |
| १७ | मौजे चास ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| १८ | मौजे चास ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे मछिंद्र लांडगे घर ते संजय शेलार रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| १९ | चिंदोडी पाटील ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| २० | खडकी ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे नगर दौंड रस्ता ते प्रशांत कोठुळे घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| २१ | देवगाव ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| २२ | पोखरी ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे पथदिवे बसविणे | १०.०० |
| २३ | देऊळगाव सिद्धी ता. अहमदनगर जि. अहमदनगर वडगाव खंडोबा मळा कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| २४ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे कोल्हेवाडी रस्ता करणे | २०.०० |
| २५ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे रामकाठी मळा रस्ता करणे | १०.०० |
| २६ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे दारकुंडे रस्ता करणे | १०.०० |
| २७ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे [illegible] मळा रस्ता करणे | १०.०० |

| | | |
|---|---|---|
| २८ | घुटेवाडी ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर येथे कडा वस्ती रस्ता करणे | १०.०० |
| २९ | कामरगाव ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे भीमराज सोनवणे घर ते विठ्ठल जाधव रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| ३० | कामरगाव ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे लक्ष्मण आंधळे घर ते अभय मंडले रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| ३१ | कामरगाव ता. अहमदनगर जि. अहमदनगर येथे भोरवाडी रोड ते घर ते निवृत्ती साठे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | २०.०० |
| | | **५५५.००** |